आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१० जानेवारी २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- १८व्या प्रवासी भारतीय दिन सोहळ्याचा राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप

- केंद्र शासनाकडून राज्यांना कर हस्तांतरण, महाराष्ट्राला मिळणार १० हजार ९३० कोटी रुपयांहून अधिक निधी

- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी मानव अधिकार आयोग स्वतंत्रपणे चौकशी करणार

- महाकुंभमेळ्यानिमित्त आकाशवाणीची विशेष वाहिनी ‘कुंभवाणी’ चं लोकार्पण

**आणि**

- महिला क्रिकेटमधे भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत राजकोट इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताचा सहा गडी राखून विजय

**<><><><><>**

परदेशस्थ भारतीय जगासमोर भारताचं खरंखुरं चित्र उभं करतात असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. १८व्या प्रवासी भारतीय दिन सोहळ्याच्या समारोप समारंभात आज त्या भुवनेश्वरमधे बोलत होत्या. वैद्यक आणि तंत्रज्ञानासह अनेक क्षेत्रात भारतीयांनी प्राविण्य मिळवलं आहे असं त्या म्हणाल्या.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १७ परदेशस्थ भारतीयांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवण्यात आलं. केंद्रीय मंत्री डॉ. एस जयशंकर, जुआल ओराम, धर्मेंद्र प्रधान तसंच ओदिशाचे राज्यपाल हरिबाबू कंभमपाटी, मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमापूर्वी राष्ट्रपतींनी प्रवासी दिन सोहळ्यानिमित्त आयोजित प्रदर्शनाला भेट दिली. या प्रदर्शनात ओदिशाची समृद्ध परंपरा साकारणाऱ्या विविध हस्तकलांची दालनं आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यातून या कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांना ओदिशाच्या परंपरेचं दर्शन घडवण्याच्या हेतूनं हे प्रदर्शन भरवलं आहे.

**<><><><><>**

केंद्र शासनाकडून सर्व राज्यांना आज एक लाख ७३ हजार ३० कोटी रुपयांचं कर हस्तांतरण जारी करण्यात आलं. यात महाराष्ट्र राज्याचा १० हजार ९३० कोटी ३१ लाख रूपयांचा वाटा आहे. यापूर्वी डिसेंबर २०२४ मध्ये सरकाने ८९ हजार ८६ कोटी रुपयांच्या कराचा वाटा राज्यांना दिला आहे. भांडवली खर्चाला गती देण्यासाठी आणि विकास आणि कल्याणाशी संबंधित खर्चांना वित्तपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनानं कर हस्तांतरण केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे याबद्दल आभार मानले आहेत. राज्याच्या विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांना यामुळं पाठबळ मिळणार असल्याचं फडणवीस यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन देशातल्या सर्व समस्यांचं निराकरण करायचं आहे असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आघाडीचे उद्योजक निखिल कामत यांना दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. सरकारी योजनाची १०० टक्के अंमलबजावणी हेच सामाजिक न्याय आणि

धर्मनिरपेक्षतेचे स्वरुप असल्याचं ते म्हणाले. माणूस म्हणून आपल्या हातून ही चुका झाल्या आहेत मात्र वाईट हेतूने कधीही चूक केली नसल्याचं त्यांनी सांगितलं.

आजच्या जगात लोकशाहीमध्ये समाज माध्यम एक महत्त्वाचं साधन असून ते लोकशाहीला सक्षम बनवू शकते असं ते म्हणाले. देशातले तरुण, समाज माध्यमावरून माहिती मिळवत विविध मुद्द्यांमध्ये रस घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. सध्याच्या जागतिक आव्हानांबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, सरकार जगातिक शांततेच्या बाजूनं आहे.

**होल्ड बाईट मोदी**

या मुलाखतीत प्रधानमंत्र्यांनी त्यांचा जीवन प्रवास, शिक्षण, राजकीय जीवन, व्यवस्थापन क्षमता आणि इतर पैलूंवर चर्चा केली.

**<><><><><>**

पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन राज्याच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वानं दिली असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. राज्याचे दुसरे मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आज चंद्रपूरमधे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विदर्भाच्या विकासाकरता कन्नमवार यांनी केलेल्या कार्याचा गौरव फडणवीस यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी मानव अधिकार आयोगानं गुन्हा दाखल करून घेतला असून या प्रकरणी आयोग स्वतंत्र चौकशी करणार आहे. संतोष देशमुख यांची अमानुषपणे केलेली हत्या ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना असून याप्रकरणाची राष्ट्रीय मानव अधिकारी आयोगाने स्वतंत्रपणे चौकशी

करावी अशी मागणी खासदार बजरंग सोनावणे यांनी केली होती. आयोग राज्य सरकारकडून अहवाल मागवणार असून सुरू असलेल्या तपासाची माहिती घेणार असल्याचं सोनावणे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं लोकार्पण आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रयागराज इथे झालं. महाकुंभ मेळा हा उत्सव जाती धर्मापलिकडे जाऊन एकतेचा संदेश देतो असं ते  यावेळी म्हणाले. याच कार्यक्रमात त्यांनी 'कुंभमंगल धून'चं देखील उद्घाटन केलं. प्रसारभारतीचे अध्यक्ष डॉ. नवनीतकुमार सहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद, तसंच आकाशवाणीच्या महांचालक डॉ. प्रज्ञा पालिवाल आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.  डॉ सहगल यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट... सहगल**

या आकाशवाणी वाहिनीवरून, आजपासून २६ फेब्रुवारी पर्यन्त महाकुंभमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमावर आधारित अनेक कार्यक्रम प्रसारित करण्यात येतील. सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांपासून रात्री १० वाजून ५ मिनिटांपर्यंत, या वाहिनीचं प्रसारण सुरू राहील. ही एफ एम वाहिनी १०३ पूर्णांक ५ अंश मेगा हर्टझवर, न्यूज ऑन ए आय आर या ॲप तसंच वेव्ह्ज ओ टी टी वर ऐकता येईल.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत आज राजकोट इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं सहा गडी, आणि ९३ चेंडू राखून विजय मिळवला. आयर्लंडन नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना

निर्धारित ५० षटकात फक्त ७ गडी गमावून २३८ धावा केल्या.. कर्णधार गॅबी लुईसनं ९२ तर लीहपॉलनं ५९ धावा केल्या. भारतातर्फे प्रिया मिश्रानं २, तर सायली सातघरे, दिप्ती शर्मा, टायट्स साधू यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. विजयासाठी २३९ धावांचं लक्ष्य भारतानं ३५ व्या षटकातच ४ गड्यांच्या मोबदल्यात मात्र प्रतिका रावलनं ८९, तेजल हसबनीसनं नाबाद ५३ धावा केल्या. कर्णधार स्मृती मंधनानं ४१, धावांचं योगदान दिलं. रिचा घोषनं २ चेंडूत २ चौकार मारत भारताची धावसंख्या २४१ वर नेली.

**<><><><><>**

नवी दिल्लीमध्ये येत्या १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातल्या पाच तर महिला संघात तीन खो-खो-पटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी पुण्याचा प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी पुण्याचीच प्रियंका इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

एच एम पी व्ही हा विषाणू देशासाठी नवा नसला, तरीही संसर्गजन्य आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, मात्र काळजी घ्यावी, असं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रताप जाधव यांनी केलं आहे. आपल्या सर्व व्यवस्था सुसज्ज आहेत. आत्तापर्यंत आढळून आलेले रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, असंही त्यांनी यवतमाळ इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**बाईट- प्रतापराव जाधव**

बुलडाणा जिल्ह्यातल्या काही गावांमध्ये नागरिकांचे केस मोठ्या प्रमाणात गळत आहेत, यासंदर्भात आरोग्य विभागाची पथकं तयार केली आहेत, अशी माहितीही जाधव यांनी दिली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकणात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. विदर्भात अनेक ठिकाणी किंचित घट झाली. सर्वात कमी किमान तापमान नागपूर इथं ९ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

राज्यात येत्या दोन दिवसात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

**//<><><><><>//**